नियम क्रमांक २/२०१४

संगणक / लॅपटॉप खरेदीकरीता अग्रीम मंजूर करण्याकरीता (सुधारणा) नियम – २०१४

ज्याअर्थी विद्यापीठ आस्थापनेतील स्थायी शिक्षक / अधिकारी व कर्मचाऱ्यांना संगणक/लॅपटॉप खरेदीकरीता अग्रीम मंजूरीकरीता तयार करण्यात आलेले नियम ९/२०१४ मध्ये सुधारणा करावयाची आहे, त्याअर्थी व्यवस्थापन परीषद सदर नियमात आणखी सुधारणा करण्याकरीता खालील प्रमाणे नियम तयार करीत आहे.

१) हे नियम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना संगणक/लॅपटॉप खरेदीकरीता अग्रीमाबाबतचे (सुधारणा) नियम २०१४ म्हणून संबोधण्यात येतील.

२) व्यवस्थापन परिषदेने मंजूरी दिल्याचे तारखेपासून हे दुरूस्ती नियम अस्तीत्वात येतील.

३) सदर मुळ नियम क्रमांक ९/२०१२ मधील अ.क्र. ०५,०६ मधील तरतुदीमध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

४) अ.क्र. ५ मधील ओळ क्रमांक ३ मधील "कमीत कमी ५ वर्षाची सलग सेवा" या ऐवजी "कमीत कमी २ वर्षाची सलग सेवा" असे वाचावे.

५) अ.क्र. ६ मधील प्रथम ओळीत "रूपये २०,०००/- (रूपये वीस हजार फक्त)" या ऐवजी "रूपये ३०,०००/- (रूपये तीस हजार फक्त)" असे वाचावे.

******